आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१२ मार्च २०२६ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देशातल्या व्यावसायिक ग्राहकांना आजपासून गॅस पुरवठा सुरू, घरगुती ग्राहकांसाठी इंधनाचा तुटवडा नसल्याचं सरकारचा पुनरुच्चार

- घरगुती वापराच्या गॅस सिलिंडरच्या नोंदणीसाठी शहरी भागात २५, तर ग्रामीण भागात ४५ दिवसांचं अंतर ठेवणं बंधनकारक, रेशन दुकानांवर रॉकेलची विक्री सुरू

- पालकांचं पद आणि प्रतिष्ठा वगळून केवळ उत्पन्नाच्या आधारे ओबीसी आरक्षणातला क्रिमी लेयर दर्जा ठरवता येणार नसल्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा

- शेजारी देशांवरचे हल्ले सुरूच ठेवण्याचा इराणच्या नवनियुक्त सर्वोच्च नेत्यांचा इशारा

आणि

- इथियोपियामध्ये भूस्खलनात ५० जणांचा मृत्यू, सव्वाशे लोक बेपत्ता

**<><><><><>**

देशातल्या व्यावसायिक ग्राहकांना आजपासून गॅस पुरवठा सुरू झाला आहे, अशी माहिती पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी आज लोकसभेत दिली. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

**व्हाइस कास्ट**

*(साठेबाजी तसंच काळाबाजार टाळण्यासाठी व्यावसायिक वापराच्या सिलिंडरवर सरकारनं निर्बंध लादले होते. आता राज्य सरकारनं दिलेल्या यादीनुसार व्यावसायिकांना सिलिंडर दिली जातील. सध्या मासिक सरासरी गरजेच्या २० टक्के गॅस पुरवठा केला जाईल अशी माहिती पेट्रोलियम मंत्र्यांनी दिली. किरकोळ ग्राहकांसाठी पेट्रोल, डिझेल, गॅस यांचा कुठलाही तुटवडा नसल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. घरगुती गॅस सिलिंडरची नोंदणी केल्यावर पूर्वीप्रमाणे सरासरी अडीच दिवसात सिलिंडर घरपोच दिले जाते. एकदा सिलिंडर घेतल्यावर पुढच्या सिलिंडरच्या नोंदणीसाठी शहरी भागात २५ दिवस तर ग्रामीण भागात ४५ दिवसांचं अंतर ठेवण्याचा नियम लागू केल्याची माहिती त्यांनी दिली. रुग्णालयं आणि शैक्षणिक संस्थांना अखंडित गॅस पुरवठा केला जात आहे, अशी माहिती पुरी यांनी दिली.*

*याशिवाय देशभरातल्या रेशन आणि किरकोळ विक्री सुरू असलेल्या दुकानांवर रॉकेल पुरवठा नियमित करण्यात आला आहे. त्यासाठी ४० हजार किलोलीटर अतिरिक्त रॉकेल वाटप करण्यात आल्याची माहिती पेट्रोलियम मंत्रालयानं दिली आहे.*

*हॉटेल आणि रेस्टॉरंटना बायोमास, आरडीएफ पेलेट्स तसंच केरोसीन किंवा कोळशाचा पर्यायी इंधन म्हणून १ महिन्यासाठी परवानगी द्यावी असा सल्ला पर्यावरण मंत्रालयाने राज्यांच्या प्रदुषण नियंत्रण मंडळाला दिला आहे.*

*होर्मुझमधून येणाऱ्या तेलपुरवठ्यापेक्षा जास्त तेल पुरवठा देशाला इतर स्रोतांकडून केली जाते. त्यामुळे भारतात कच्च्या तेलाचा पुरवठा सुरळीत होत आहे.*

*इतिहासातल्या सर्वात मोठ्या कच्च्या तेलाचा संकटाचा सामना देश करतो आहे. अफवा पसरवण्याची ही वेळ नसून अशा परिस्थितीचा सर्वांनी एकोप्यानं सामना करावा, असं आवाहन त्यांनी केलं. )*

**<><><><><><>**

रशियाकडून ३० दिवसांसाठी तेल खरेदीची परवानगी अमेरिकनं भारताला दिल्याच्या मुद्द्यावरुन लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज टीका केली. कोणत्याही देशासाठी ऊर्जा सुरक्षा हा महत्त्वाचा मुद्दा असतो. अशावेळी आपण कोणाकडून तेल विकत घ्यावे किंवा घेऊ नये हे दुसऱ्या देशांनी ठरवणे गंभीर असल्याचं ते म्हणाले. त्यानंतर त्यांनी पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांच्यावर काही टिप्पणी केल्यानं सभापती ओम बिर्ला यांनी त्यांना विषयापासून न भरकटण्याचा सल्ला दिला. राहुल गांधी यांच्या टिप्पणीवर सत्ताधारी पक्षाच्या खासदारांनीही आक्षेप घेतला.

एलपीजीच्या तुटवड्यासंदर्भात बोलण्यासाठी त्यांनी सभापतींकडे परवानगी मागितली होती. मात्र तो विषय सोडून ते इतर विषयावर बोलू लागले. हे संसदेच्या नियमांचं उल्लंघन असल्याची टीका संसदीय कार्यमंत्री किरेन रीजिजू यांनी केली. संसदेचं कामकाज भरकटवणं आणि देशाची निंदानालस्ती करण्याचे प्रयत्न राहुल गांधी करत असल्याचं केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल म्हणाले.

**<><><><><><>**

लोकसभेत आज चालू आर्थिक वर्षांसाठीच्या पूरवणी अनुदान मागणीवर चर्चा झाली. यामध्ये ६१ अनुदानं असून त्यामुळे सरकारी तिजोरीवर २ लाख ८१ हजार कोटी रुपयांचा बोजा पडणार आहे. चर्चेला सुरुवात करताना जगदंब पाल यांनी

चर्चेला सुरुवात केली. सध्या जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किंमती बॅरल मागे ८८ रुपयांहून ११९ रुपयांवर गेल्याचं त्यांनी सांगितलं. समाजवादी पार्टीचे खासदार राम शिरोमणी वर्मा यांनी शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी करत खासदारांचा सध्याचा निधी पाच कोटी रुपयांवरुन २५ कोटी रुपये करण्याची मागणी यावेळी केली. आखाती देशातल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सरकारनं सर्वपक्षीय बैठक बोलवावी. देशहितासाठी काम करायला विरोधी पक्ष तयार असल्याचं खासदार सुप्रिया सुळे यावेळी म्हणाल्या.

**<><><><><>**

पालकांचं पद आणि प्रतिष्ठा वगळून केवळ पालकांच्या उत्पन्नाच्या आधारे ओबीसी आरक्षणातला क्रिमी लेयर दर्जा ठरवता येणार नाही, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयानं आज दिला. सरकारी नोकरीतल्या अधिकाऱ्यांच्या मुलांना क्रिमी लेयर दर्जा दिला जातो. मात्र सरकारच्या अंगिकृत उपक्रमांमधल्या समकक्ष कर्मचाऱ्यांच्या मुलांना किंवा खाजगी क्षेत्रात काम करणाऱ्यांच्या मुलांना क्रिमी लेयर बाहेर ठेवलं जातं. हा भेदभाव असल्याचं निरीक्षण न्यायालयानं नोंदवलं.

सनदी सेवा परीक्षांकरता ओबीसी आरक्षणाचा लाभ मागणाऱ्या उमेदवारांच्या पात्रतेविषयी दाखल झालेल्या याचिकांवर दिल्ली, मद्रास, आणि केरळ उच्च न्यायालयांनी दिलेले निर्णय कायम ठेवत याबाबत केंद्र सरकारनं दाखल केलेल्या याचिका न्यायालयानं फेटाळून लावल्या.

**<><><><><>**

देशातल्या सहकारी दुध उत्पादक संस्थांच्या सदस्य नसलेल्या सर्व दुग्ध उत्पादकांनी लवकरात लवकर आवश्यक नोंदणी करण्याच्या आणि परवाना मिळवण्याच्या मार्गदर्शक सूचना FSSAI अर्थात अन्न सुरक्षा आणि मानके प्रधिकरणानं दिल्या आहेत. दूध आणि दूग्धजन्य पदार्थांचा व्यवसाय करणाऱ्या

अनेकांकडे परवाना नसल्याचं आढळून आलं असून व्यवसाय सुरु करण्यासाआधीच परवाना मिळवावा असंही सूचनेत म्हटलं आहे.

**<><><><><><>**

गेल्या महिन्यात किरकोळ चलन फुगवट्याचा दर ३ पूर्णांक २१ शतांश टक्क्यापर्यंत वाढला आहे. त्याआधीच्या, म्हणजे जानेवारी महिन्यात हा दर २ पूर्णांक ७४ शतांश टक्के होता. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयानं प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार गेल्या महिन्यात हा दर खाद्यान्नाच्या बाबतीत ३ पूर्णांक ४७ शतांश टक्क्यावर पोचला. सोनं -चांदी, हिरे, आणि पलॅटिनमचे दागिने, खोबरं, टोमॅटो, कॉलिफ्लॉवर इत्यादींच्या दरात मोठी वाढ दिसून आली. याउलट कांदा, लसूण, बटाटा, तूर, लिची इत्यादींचे दर कमी झाल्याचं यात म्हटलं आहे.

**<><><><><><>**

भारत आणि इराण यांच्या परराष्ट्र मंत्र्यांमध्ये गेल्या काही दिवसात झालेल्या चर्चांमध्ये व्यावसायिक जहाजांची सुरक्षितता आणि भारताच्या उर्जा सुरक्षेशी संबंधित मुद्द्यांवर चर्चा झाल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैयस्वाल यांनी दिली. इराणमध्ये ९ हजार भारतीय असून तेहरानमधून अनेक भारतीयांना सुरक्षित ठिकाणी हलवलं आहे. अझरबैजान आणि आर्मेनियामार्गे निघून जाऊ इच्छिणाऱ्यांना व्हीसा आणि अन्य मदत करण्यात येत आहे, असंही जयस्वाल म्हणाले.

बांगलादेश, श्रीलंका आणि मालदीवकडून आलेल्या पेट्रोलियम उत्पादनांच्या विनंतीविषयी जयस्वाल म्हणाले की, २०१७पासून बांगलादेशाला मोठ्या प्रमाणावर डीझेल निर्यात सुरू आहे आणि भारताची शुद्धिकरण क्षमता, देशांतर्गत गरज आणि इंधनाची उपलब्धता लक्षात घेऊन श्रीलंका आणि मालदीवच्या विनंतीचा आढावा घेतला जाईल, असं जयस्वाल यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><><>**

इराणनं होर्मुझच्या सामुद्रधुनीतून भारतीय तेलवाहू जहाजाला परवानगी दिल्यानंतर काल एक तेलवाहू जहाज मुंबईच्या किनाऱ्यावर येऊन पोहोचलं. या तेलवाहू जहाजातून १ लाख ३५ हजार ३३५ टन कच्चं तेलं आलं असून जवाहर द्वीप इथं हे तेल उतरवून घेण्याच्या कामाला सुरुवात झाली असल्याची माहिती मुंबई बंदर प्रशासनानें दिली आहे.

<><><><><><>

शेजारी देशांवर इराणचे हल्ले सुरूच राहतील, असं इराणचे नवनियुक्त सर्वोच्च नेते अयातुल्लाह मोज्तबा खामेनी यांनी आज सांगितलं. होर्मुझची सामुद्रधुनी बंद करण्याचा लाभ उठवला पाहिजे, असं ते म्हणाले. त्यांच्या नियुक्तीनंतरचं त्यांचं पहिलंच भाष्य सरकारी दूरचित्रवाहिनीवर वाचून दाखवण्यात आलं. खामेनी स्वतः कॅमेऱ्यासमोर आले नाहीत.

एका शाळेवर झालेल्या हल्ल्यासह युद्धात मारल्या गेलेल्यांचा बदला घेण्याची शपथ त्यांनी घेतली. इराण त्याच्या शत्रूकडून भरपाई मिळवेल वसूल करेल. त्यासाठी त्यांनी नकार दिला, तर इराण त्यांच्या मालमत्तेतून घेईल किंवा त्यांनाही तेवढीच हानी पोचवेल, असं ते म्हणाले.

<><><><><><>

इथोपियामध्ये आलेल्या मुसळधार पावसामुळे तीन जिल्ह्यात झालेल्या भूस्खलनाच्या घटनांमध्ये ५० जणांचा बळी गेला असून सव्वाशे लोक बेपत्ता आहेत. इथोपियाच्या प्रशासनानं ही माहिती दिली. इथोपियातल्या गाचो बाबा, कांबा आणि बोंके जिल्ह्यात दरडी कोसळल्या असून आपत्तीव्यवस्थापन  दल मदत कार्य करत असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे. चिखलात फसल्यानं अनेकांचा बळी गेल्याची शक्यताही वर्तवण्यात आली आहे.

<><><><><><>

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर ८२९ अंकांची घसरण झाली आणि तो ७४ हजार ३४ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २२८ अंकांची घसरण नोंदवत २३ हजार ६३९ अंकांवर बंद झाला.

//<><><><><><>//